# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई


एमएमटीसी हाऊस, ५ वा मजला
प्लॉट नं. सी २२, ब्लॉक - ई,
वांद्रे कुर्ला संकुल,
वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.

संकेतस्थळ- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com


जावक क्र. ९८१२ /२०२५
गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२ **दिनांक :-** 22 AUG 2025

**प्रति,**

**१. अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/नाशिक/छ.संभाजीनगर**

**२. कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)**

**विषय :-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाच्या सुधारित कार्यपध्दतीबाबत.**

**संदर्भ :-** १. मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.१३०५/ गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२ दि.३०.०६.२०२५

२. मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.१३१८/ गृहसं-२०२५/प्र.क्र.०१/योजना-१२ दि.०१.०७.२०२५

उपरोक्त संदर्भिय क्र.०१ व ०२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाबाबत सुधारित कार्यपध्दतीबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. विविध स्तरावरून प्राप्त विनंतीच्या अनुषंगाने सदरच्या कार्यपध्दतीमध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

(अ) बांधकाम कामगाराने दयावयाचे स्वयं:घोषणापत्र संगणक प्रणालीमध्येच तयार होणार असल्याने बांधकाम कामगाराने ते स्वतंत्रपणे भरून देण्याची आवश्यकता असणार नाही.

(ब) बांधकाम कामगाराने ऑनलाईन पध्दतीने निश्चित भेट दिनांक (Appointment) करीता अर्ज सादर करताना मंडळाच्या एकात्मिक संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीकृत

मोबाईल क्रमांकावर OTP (One Time Password) येईल. सदर OTP द्वारे दिनांक व वितरण केंद्र निवडीची प्रक्रिया पूर्ण होईल.

(क) प्रत्येक वितरण केंद्राची प्रतिदिन वितरण क्षमता २५० ऐवजी ५०० इतकी ठेवण्यात आली आहे.

(ड) सर्व वितरण केंद्राकरीता दिनांक ३१.१०.२०२५ पर्यंतचे दिनांक (शासकीय सुट्टया वगळून) खुले ठेवण्यात आली आहेत. आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात येईल.

(इ) संकेतस्थळावरील बांधकाम कामगाराचा फोटो व बांधकाम कामगाराने सादर कलेले मंडळाचे ओळखपत्र/ आधारकार्डवरील फोटो एकसमान नसल्यास गृहपयोगी वस्तू संच वितरीत करण्यात येऊ नये. तथापि, स्वतंत्र घोषणापत्र सादर केले नाही या कारणाकरीता वितरण केंद्रावरून गृहपयोगी वस्तू संच वाटप नाकारण्यात येऊ नये.

३. उपरोक्त प्रमाणे प्राप्त होणाऱ्या अर्जानुसार बांधकाम कामगाराचे बोटांचे ठसे (Biometric) व छायाचित्र (Online Photo) घेऊन त्यांना गृहपयोगी वस्तू संच ताब्यात देऊन लेखी पोहोच घेण्यात यावी.

२३/०८/२०२५

**(विवेक कुंभार)**
**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**प्रत :-**

१. मा. मंत्री महोदय (कामगार) यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. राज्यमंत्री महोदय (कामगार) यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
३. मा. प्रधान सचिव (कामगार) उदयोग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
४. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
५. मुख्य व्यवस्थापक, (Institutional Sales) मे. मफतलाल इंडस्ट्रिज लिमिटेड, ५ वा मजला, मफतलाल हाऊस, एच.टी. पारेख मार्ग, बॅकबे रिक्लमेशन, मुंबई- ४०० ०२०